# कृषि पणन विषयक बातम्या : मे 2026

Agrowon, 22/05/2026

## पणन व्यवस्था डिजिटल करणार

### पणनमंत्री रावल यांच्या आढावा बैठकीत सूचना

अ‍ॅग्रोवन वृत्तसेवा



जयकुमार रावल

पुणे : महाराष्ट्र फलोत्पादन, शेतीमाल उत्पादन आणि कृषी विपणनाच्या दृष्टीने महत्त्वाचे असून, समुद्रमार्गे मध्य-पूर्व आशियायी देशात मोठ्या प्रमाणात भाजीपाला, फळे व इतर शेतीमाल निर्यात होते. ही निर्यातीची संधी आणखी वाढविण्यासाठी राज्यातील कृषी पणन व्यवस्था जागतिक पणन व्यवस्थेच्या दृष्टीने सक्षम आणि अत्याधुनिक होणे आवश्यक आहे. यासाठी 'डिजिटल मार्केटिंग'च्या दृष्टीने नियोजन करावे, अशा सूचना पणनमंत्री जयकुमार रावल यांनी आढावा बैठकीत दिल्या.

मंत्री रावल यांच्या उपस्थितीत बुधवारी (ता.२०) वरिष्ठ पणन अधिकाऱ्यांची बैठक झाली. त्या वेळी दूरदृश्य प्रणालीवर पणन विभागाचे सचिव प्रवीण दराडे, तर बैठकीत कापूस पणन महासंघाचे व्यवस्थापकीय संचालक अभय महाजन, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक कौस्तुभ दिवेगावकर, महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघाचे व्यवस्थापकीय संचालक राहुल कुलकर्णी, सहसंचालक दीपक शिंदे, कृषी पणन मंडळाचे व्यवस्थापकीय संचालक संजय कदम, पणन संचालक शरद जरे आदी उपस्थित होते.

मंत्री रावल म्हणाले, की राज्याची तीन ट्रिलियन अर्थव्यवस्था विकसित करण्यासाठी कृषी विपणन व्यवस्था डिजिटल होणे आवश्यक आहे. महाराष्ट्राला ७२० किलोमीटर लांबीचा समुद्रकिनारा लाभला असून, मध्यपूर्व आशियात मोठ्या प्रमाणात कृषी मालाची निर्यात होते. ही निर्यात अधिक वाढविण्यासाठी राज्याची पणन व्यवस्था डिजिटल होणे आवश्यक आहे. म्हणून उत्पादित केलेल्या शेतीमालाला काढणीपासून ते विक्री होऊन शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा होईपर्यंत सर्व व्यवस्था डिजिटल करण्यावर भर देण्यात यावा. शेतकऱ्यांच्या मालाला स्पर्धात्मक दर मिळविण्यासाठी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय बाजारात घडणाऱ्या घडामोडी डिजिटल पद्धतीने शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याची व्यवस्था विकसित करण्यात यावी, असेही ते म्हणाले.

Agrowon, 18/05/2026

# भारतीय गुळाची गोडी पोहोचली सातासमुद्रापार

## अमेरिकेसह यूएई, इंडोनेशियात मागणीत वाढ

राजकुमार चौगुले ः ॲग्रोवन वृत्तसेवा

कोल्हापूर : भारतीय गुळाची गोडी आता जागतिक बाजारपेठेतही वाढू लागली आहे. २०१५-१६ मध्ये ३.६५ लाख टनांवर असलेली गूळ निर्यात २०२४-२५ मध्ये वाढून ५.६० लाख टनांच्या पुढे गेली आहे. केंद्रीय अहवालानुसार, गेल्या दहा वर्षांत म्हणजेच २०१५-१६ ते २०२४-२५ या कालावधीत भारतीय गूळ निर्यातीच्या मूल्यात तब्बल १०६.५ टक्क्यांची वाढ नोंदविण्यात आली आहे.

२०१५-१६ मध्ये भारतातून सुमारे १९७ दशलक्ष डॉलर्स मूल्याचा गूळ निर्यात झाला होता. तोच आकडा २०२४-२५ मध्ये वाढून ४०६.८ दशलक्ष डॉलर्सपर्यंत पोहोचला आहे. भारतीय गुळाला अमेरिका, इंडोनेशिया, संयुक्त अरब अमिरात, नायजेरिया आणि नेपाळ या देशांत मोठी मागणी असल्याचे दिसून येत आहे.

भारत हा जगातील सर्वाधिक गूळ उत्पादक देश ठरला असून, जागतिक उत्पादनातील देशाचा वाटा ७० टक्क्यांहून अधिक आहे. देशातील एकूण ऊस उत्पादनापैकी सुमारे २० ते ३० टक्के ऊस गूळ निर्मितीसाठी वापरला जातो. ग्रामीण भागातील सुमारे २५ लाख लोकांच्या रोजगाराला या उद्योगाचा आधार मिळत आहे.

देशातील गूळ उत्पादनात उत्तर प्रदेश आघाडीवर असून, २०२४-२५ मधील उत्पादनात राज्याचा ४८.५ टक्के वाटा आहे. मुजफ्फरनगरचा गूळ निर्यातक्षम गुणवत्तेसाठी विशेष प्रसिद्ध आहे. महाराष्ट्राचा उत्पादनातील वाटा २४.१ टक्के असून, कोल्हापूर, सांगली, सोलापूर आणि पुणे परिसरात गूळ उद्योगाचे मोठे जाळे आहे. कर्नाटकाचा वाटा १०.५ टक्के असून, तेथील पारंपरिक प्रक्रिया उद्योग ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ देत आहेत. गुजरात, तमिळनाडू, बिहार, पंजाब, हरियाणा आणि मध्य प्रदेशमध्येही गूळ उत्पादनाचा विस्तार होत आहे.

केंद्रीय सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, गूळ उद्योगाला चालना देण्यासाठी केंद्र सरकार विविध योजनांद्वारे आर्थिक साह्य करत आहे. पंतप्रधान किसान संपदा योजना, पंतप्रधान सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना आणि 'एक जिल्हा एक उत्पादन' योजनांमुळे गूळ प्रक्रिया उद्योगांना मोठा आधार मिळाला आहे. २०२१ ते २०२४ या काळात गूळ आणि मध या नैसर्गिक गोड पदार्थांच्या बाजारात १५ ते २० टक्के वार्षिक वाढ दर नोंदविण्यात आला आहे. ऑगस्ट २०२४ पर्यंत देशांतर्गत बाजारात गुळाची वार्षिक विक्री सुमारे ५००० टनांपर्यंत पोहोचली आहे.



### देशातील प्रमुख गूळ उत्पादक राज्ये

| राज्य | उत्पादनातील वाटा टक्के |
|---|---|
| उत्तर प्रदेश | ४८.५ |
| महाराष्ट्र | २४.१ |
| कर्नाटक | १०.५ |

### पंतप्रधान किसान संपदा योजनेअंतर्गत ३५२८ उद्योगांना अनुदान

- एकूण साह्य : १०२.३१ कोटी रुपये
- पंतप्रधान सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजनेअंतर्गत अंतर्गत ५ प्रकल्पांना १७.०७ कोटी रुपये
- 'एक जिल्हा एक उत्पादन' योजनेत १९ जिल्ह्यांचा समावेश

Agrowon, 16/05/2026


# व्हिएतनामची बाजारपेठ भारतीय द्राक्षांसाठी खुली

## निर्यातीला सुरुवात; नियम, तपासणी काटेकोर पाळणे बंधनकारक

ॲग्रोवन वृत्तसेवा

नवी दिल्ली : भारतीय ताज्या द्राक्षांच्या निर्यातीसाठी व्हिएतनामची बाजारपेठ खुली झाली असून, ६ मे २०२६ पासून निर्यातीला अधिकृत सुरुवात झाली आहे. कृषी उत्पादन निर्यात विकास प्राधिकरणाने (अपेडा) १३ मे रोजी यासंदर्भात परिपत्रक जारी केले.

व्हिएतनामच्या 'प्लँट प्रॉडक्शन अँड प्रोटेक्शन डिपार्टमेंट'ने (पीपीडी) २८ एप्रिल रोजी भारतीय द्राक्षांना आपल्या बाजारपेठेत प्रवेश मंजूर केल्याची माहिती दिली होती. केंद्रीय कृषी मंत्रालयाने हे पत्र १ मे रोजी 'अपेडा'कडे पाठविले. या निर्यातीसाठी 'सिस्टम ॲप्रोच' पद्धत बंधनकारक करण्यात आली आहे. त्यामुळे द्राक्ष बागेपासून कंटेनरपर्यंत प्रत्येक टप्प्यावर निश्चित नियम



आणि तपासणी प्रक्रिया काटेकोरपणे पाळावी लागणार आहे.

निर्यातीदरम्यान कंटेनरमधील द्राक्षांच्या गराचे तापमान सलग १५ दिवस १.१ अंश सेल्सियस ठेवणे आवश्यक राहणार आहे. 'इन-ट्रान्झिट कोल्ड ट्रिटमेंट' म्हणून ओळखली जाणारी ही प्रक्रिया फळमाशी नियंत्रणासाठी महत्त्वाची मानली जाते.

तसेच व्हिएतनामने लागू केलेल्या फायटोसॅनिटरी आयात अटींचे (पीआयआर) पालन करणेही निर्यातदारांसाठी अनिवार्य राहणार आहे.

### नवीन बाजारपेठ उपलब्ध

'अपेडा'ने इच्छुक निर्यातदारांना या नव्या संधीचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे. या निर्णयामुळे महाराष्ट्रातील नाशिक, सांगली आणि सोलापूर भागांतील द्राक्ष उत्पादक व निर्यातदारांना नवीन निर्यात बाजारपेठ उपलब्ध होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

Agrowon, 14/05/2026

# सांगलीतून डाळिंबाची सहाशे टन निर्यात

## गत वर्षीच्या तुलनेत २५० टनांनी वाढ

अभिजित डाके : ॲग्रोवन वृत्तसेवा

सांगली : अतिवृष्टी, बदलते वातावरण आणि नैसर्गिक संकटांच्या तडाख्यात जिल्ह्यातील डाळिंब बागा अडचणीत सापडल्या होत्या. त्यामुळे काही काळ डाळिंब निर्यात मंदावली होती. मात्र कृषी विभागाने निर्यात वाढीसाठी विविध उपक्रम राबविले. त्यामुळे जिल्ह्यातील डाळिंब व डाळिंब दाण्यांच्या निर्यातीला पुन्हा गती मिळत आहे.

२०२५-२६ या आर्थिक वर्षात ५८९ टन निर्यात झाली आहे. तर, २४-२५ च्या तुलनेत मागील वर्षात २५० टनांनी वाढ झाली आहे.

जिल्ह्यात डाळिंबाचे क्षेत्र सुमारे नऊ हजार हेक्टर इतके आहे. जिल्ह्यातील प्रामुख्याने आटपाडी तालुक्यात सर्वाधिक डाळिंब क्षेत्र असून त्याखालोखाल जत तालुक्याचा क्रमांक लागतो. गेल्या वर्षभरात शेतकरी डाळिंब लागवडीकडे वळला आहे. त्यामुळे जिल्ह्यातील डाळिंबाचे क्षेत्रात अंदाजे एक ते दीड हजार हेक्टरने वाढले असा अंदाज कृषी विभागाने व्यक्त केला आहे. शेतकऱ्यांकडून मृग, हस्त आणि आंबिया बहार धरला जातो. सर्वाधिक हंगाम मृग बहरात असतो. त्यानुसार डाळिंब उत्पादक शेतकरी बहराचे नियोजन करतो.

डाळिंब व डाळिंबाचे दाणे यांची वर्षभर निर्यात होते. सर्वाधिक निर्यात मृग बहरातील डाळिंबाची होते. आटपाडी तालुक्यासह जत, कवठेमहांकाळ तालुक्यातून डाळिंबाची निर्यात होते. फ्रान्स, नेदरलँड, सिंगापूर, स्वित्झर्लंड, अमेरिका, सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिराती या देशांत निर्यात होते. सर्वाधिक निर्यात युरोपियन देशात होत आहे.

गेल्या काही बदलत्या वातावरणामुळे उत्पादनही कमी झाले आहे. त्यामुळे देशांतर्गत बाजारपेठेत डाळिंबाची आवक मंदावली असल्याचे चित्र आहे. यंदाही हीच परिस्थिती दिसून येते. त्यामुळे देशांतर्गत बाजारात आवक कमी असल्याने डाळिंबाला चांगले दर मिळत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांचा निर्यातीकडे कल काहीसा कमी झाला असल्याचे चित्र आहे.

जिल्ह्यातून डाळिंबासह अन्य फळांची निर्यात वाढावी यासाठी कृषी विभागाने तालुकास्तरावर मेळावे, प्रशिक्षणासह घेतले. त्यानंतर जिल्हा स्तरावर 'बायर सेलर मिटी'असा उपक्रम राबवला. या उपक्रमात निर्यातदार आले होते. त्यामुळे याचा फायदा शेतकऱ्यांना झाला. गतवर्षीच्या आर्थिक वर्षात डाळिंबाची निर्यातीत वाढ झाली आहे.



**जिल्ह्यातून झालेली डाळिंबाची निर्यात दृष्टीक्षेप**

| वर्ष | टन |
|---|---|
| २०२३-२४ | ३७.३५ |
| २०२४-२५ | ३३९.७७ |
| २०२५-२६ | ५८९.९६ |


Agrowon, 13/05/2026

# अकोला बाजार समितीत सोयाबीनला विक्रमी दर

## बियाणे दर्जाच्या सोयाबीनला साडेसात हजारांपर्यंत दर

ॲग्रोवन वृत्तसेवा

अकोला : अकोला कृषी उत्पन्न बाजार समितीत सोयाबीनच्या दरात मोठी उसळी पाहायला मिळत असून, मंगळवारी (ता. १२) बियाणे दर्जाच्या सोयाबीनला प्रति क्विंटल तब्बल ७,५०० रुपये, तर नियमित सोयाबीनला ७,४०० रुपयांपर्यंत दर मिळाला. मागील काही दिवसांपासून सुरू असलेल्या दरवाढीमुळे शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.



विशेष म्हणजे, अकोल्यात सोयाबीनला गेल्या पाच वर्षांतील हा सर्वाधिक दर मानला जात आहे.

आंतरराष्ट्रीय बाजारातील घडामोडी, खाद्यतेलाच्या वाढत्या मागणीचा परिणाम आणि सोयाबीनच्या उपलब्धतेतील मर्यादा यामुळे बाजारात दरवाढीचा कल अधिक तीव्र झाला आहे. सोमवारी (ता. ११) अकोला बाजार समितीत सोयाबीनला किमान ६३०० रुपये आणि कमाल ६,७९५ रुपये प्रति क्विंटल दर मिळाला होता. मात्र अवघ्या एका दिवसात दरात लक्षणीय वाढ होत दर ७,५०० रुपयांपर्यंत पोहोचल्याने व्यापारी आणि शेतकरी दोघांचेही लक्ष या बाजाराकडे लागले आहे.

सध्या बाजार समितीत दररोज अंदाजे दीड हजार ते दोन हजार क्विंटल सोयाबीनची आवक होत आहे. बाजारात विक्रीसाठी येणारा बहुतांश माल हा शेतकऱ्यांनी काही महिन्यांपासून साठवून ठेवलेला आहे. काही खरेदीदारांनी तर मागील दोन ते तीन वर्षांपासून साठवलेले सोयाबीनही वाढत्या दराचा फायदा घेण्यासाठी विक्रीसाठी आणण्यास सुरुवात केली आहे. दरवाढीमुळे शिल्लक साठा हळूहळू बाहेर पडत असल्याचे चित्र आहे. व्यापाऱ्यांच्या मते, नवीन हंगामातील सोयाबीन बाजारात येईपर्यंत हाच साठा टप्प्याटप्प्याने विक्रीसाठी येत राहणार आहे.

Pudhari, 08/05/2026

# पणन मंडळाच्या सुविधा केंद्रांतून १०७८ मे. टन आंबा निर्यात पूर्ण

**पुढारी वॉच**

- कोकणातील हापूस, मराठवाड्यातील केशर आंब्यांचा समावेश
- आंबा निर्यातीतून देशाला मिळाले ४० कोटी रुपयांचे परकीय चलन
- पणनमंत्री जयकुमार रावल यांच्या मार्गदर्शनाखाली आंबा निर्यातीवर विशेष लक्ष



आयातदार देशांच्या निरीक्षकांमार्फत आंब्यांची तपासणी करूनच निर्यात केली जाते. वाशी येथील सुविधा केंद्रावर टिपलेली छायाचित्रे.

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या राज्यातील विविध निर्यात सुविधा केंद्रांमधील सुविधांचा वापर करून यंदाच्या २०२६ च्या हंगामात सुमारे १५०० मेट्रिक टन आंबा निर्यातीचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. त्यापैकी सद्यःस्थितीत १०७८ मेट्रिक टन म्हणजे उद्दिष्टाच्या ७२ टक्क्यांइतकी आंबा निर्यात पूर्ण झालेली आहे. त्यातून देशाला सुमारे ३५ ते ४० कोटी रुपयांचे परकीय चलन मिळण्याची अपेक्षा आहे. कोकण विभागातील हापूस, मराठवाड्यातील केशर व इतर भागांतील आंब्याचा निर्यातीमध्ये समावेश आहे.

राज्याचे पणनमंत्री व पणन मंडळाचे अध्यक्ष जयकुमार रावल यांच्या मार्गदर्शनाखाली अधिकाधिक आंबा निर्यात पूर्ण करण्यावर विशेष लक्ष केंद्रित केले आहे. भारतातून सुमारे ६० ते ७० देशांमध्ये आंब्याची निर्यात केली जाते. त्यापैकी सुमारे ८० ते ८५ टक्के आंबा हा महाराष्ट्रातून निर्यात केला जातो. यावर्षी समुद्रमार्गे आंबा निर्यातीसाठी खासगी निर्यातदारांना प्रोत्साहन दिले आहे. विविध विकसित देशांच्या मागणीनुसार निर्यातीपूर्वी देशनिहाय आंब्यावर काही विशेष प्रक्रिया करणे आवश्यक असते. निर्यातीसाठीच्या आंब्यांवर पॅकहाऊस, उष्ण जल प्रक्रिया (हॉट वॉटर ट्रीटमेंट), उष्ण बाष्प प्रक्रिया (व्हेपर हीट ट्रीटमेंट), विकिरण प्रक्रिया आदी निर्यात सुविधा या कृषी पणन मंडळाने उभारल्या आहेत. या सुविधांच्या वापरातून यशस्वी आंबा निर्यात सुरू आहे.

> केंद्र शासनाच्या अपेडा या संस्थेमार्फत विकसित करण्यात आलेल्या 'मॅंगोनेट' या ऑनलाइन प्रणालीवर देशभरातील निर्यातक्षम आंबाबागांची नोंदणी केली जाते. चालू हंगामात देशात एकूण ११ हजार ८७१ बागांची नोंदणी झाली असून, त्यापैकी ३ हजार ७०८ बागा महाराष्ट्रातील आहेत. कृषी पणन मंडळाच्या वाशी-नवी मुंबई येथील आंबा निर्यात सुविधा केंद्रात सर्व आधुनिक सुविधा उपलब्ध आहेत. याशिवाय नाचणे (रत्नागिरी), जामसंडे (सिंधुदुर्ग) व बारामती (पुणे) येथील सुविधा केंद्रेही आंबा प्रक्रिया (प्रतवारी, पॅकिंग इ.) व निर्यातीकरिता कार्यान्वित आहेत.
>
> **- संजय कदम**, कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे.

**पणन मंडळाच्या सुविधा केंद्रातून झालेली आंबा निर्यात (मेट्रिक टनात)**

| | |
|---|---|
| अमेरिका | ४५१.९ |
| ऑस्ट्रेलिया | २९.७९ |
| मलेशिया | ०.७४ |
| न्यूझीलंड | ६१.८ |
| युरोपियन देश | ५५.८२ |
| इंग्लंड | ४७७.५२ |
| एकूण | १०७८ मे. टन |

Agrowon, 05/05/2026

# विदर्भात सोयाबीन दरात उसळी

## अमरावती, अकोला बाजार समित्यांत दर ६३६५ रुपयांवर

अॅग्रोवन वृत्तसेवा

**अमरावती/अकोला :** आंतरराष्ट्रीय बाजारातील घडामोडी, खाद्यतेलाच्या किमतीत वाढ आणि सोयापेंडच्या वाढत्या मागणीमुळे स्थानिक बाजार समित्यांमध्ये सोयाबीन दरात उसळी पाहायला मिळत आहे. शनिवारी (ता. २) अमरावती बाजार समितीत सोयाबीनला ६३६५ रुपये प्रति क्विंटल असा हंगामातील सर्वाधिक दर मिळाला. तर सोमवारी (ता. ४) देखील ६३६१ रुपयांवर दर होते. तर अकोला कृषी उत्पन्न बाजार समितीतही प्रति क्विंटलला ६४०० रुपये कमाल दर मिळाला आहे.



चालू हंगामाच्या सुरुवातीला सुमारे ५३२८ रुपये प्रति क्विंटल दर असलेल्या सोयाबीनमध्ये आता तब्बल १००० रुपयांहून अधिक वाढ नोंदवली गेली आहे. बाजारात मागील काही दिवसांपासून आवक सातत्याने घटत आहे. त्यामुळे दराला आधार मिळत आहे. पोल्ट्री उद्योगाकडून सोयापेंडला वाढती मागणी असल्याने प्रक्रिया उद्योगांनी खरेदी वाढवली आहे. त्यामुळे बाजारात सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून दरात तेजी कायम आहे. तज्ज्ञांच्या मते, कमी आवक कायम राहिल्यास पुढील काही दिवसांत दर स्थिर राहण्याची किंवा आणखी वाढण्याची शक्यता आहे. मात्र या दरवाढीचा फायदा सर्वसामान्य शेतकऱ्यांना मर्यादितच मिळत आहे. हंगामाच्या सुरुवातीलाच बहुतांश शेतकऱ्यांनी कमी दरात सोयाबीन विक्री केली असल्याने सध्या वाढलेल्या दराचा लाभ मुख्यतः साठा करून ठेवलेल्या व्यापाऱ्यांना आणि काही मोजक्या शेतकऱ्यांनाच मिळत आहे.

> देशांतर्गत सोयातेलाच्या दरात सुधारणा आणि सोयापेंडच्या मागणीत वाढ झाल्यामुळे स्थानिक बाजारात तेजी दिसून येत आहे. आवक कमी असल्याने दर काही काळ टिकून राहण्याची शक्यता आहे.
> - संजय जाजू, व्यापारी

पान ४ वर »

# विदर्भात सोयाबीन दरात उसळी

» पान १ वरून

दरम्यान, जागतिक बाजारपेठेतील अनिश्चितता लक्षात घेता आगामी काळात दरातील चढ-उतार कायम राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### अकोल्यात किमान दर ५६९० रुपयांवर

अकोला : पश्चिम विदर्भातील अकोला कृषी उत्पन्न बाजार समितीत सोमवारी (ता. ४) सोयाबीनला कमाल ६४०० रुपये प्रति क्विंटल असा दर मिळाला, तर किमान दरही साडेपाच हजारांच्या पुढे जात ५६९० रुपयांवर पोहोचला आहे. आगामी खरीप हंगामाच्या तोंडावर हे दर शेतकऱ्यांच्या दृष्टीने फायदेशीर मानले जात आहे. सोमवारी येथील बाजारात सोयाबीनची २१०० पोत्यांपेक्षा अधिक आवक झाली होती. या मालाला सरासरी भाव ६३४५ रुपये नोंदवला गेला. दरात झालेल्या या वाढीमुळे बाजारपेठेत उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे. गेल्या काही दिवसांपासून सोयाबीनच्या दरात चढ-उतार सुरू होते. मात्र या आठवड्यात तब्बल ४०० रुपयांनी कमाल दर वाढला आहे. व्यापाऱ्यांकडून चांगली मागणी असल्याने पुढील काही दिवसांतही दर स्थिर राहण्याची किंवा वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.